वर्ष-०८ | अंक-५२ | मुंबई, मंगळवार १५ ते २१ नोव्हेंबर - २०२२ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
तीन विषाणूंच्या समिक्ष संसगार्चा आता धोका

3 → औरंगाबाद शहर पोलिसांची मोठी कारवाई, एक लाखांचा गुटखा पकडला

मृत पित्याला जिवंत करण्यासाठी 2 महिन्याच्या बालकाचे अपहरण, पोलिसांच्या सतर्कतेमुळे अघोरी कृत्याचा पर्दाफाश ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## डोंबिवलीत आरटीओची ४० बेशिस्त रिक्षा चालकांवर कारवाई

### दीड लाखाहून अधिक रकमेचा दंड वसूल



डोंबिवली पूर्व, पश्चिम भागातील काही रिक्षा चालक मनमानीने भाडे आकारणी करणे, वाहनतळावर उभे राहून प्रवासी वाहतूक न करणे, अशा प्रकारची उद्दामगिरी करत असल्याने उपप्रादेशिक परिवहन कल्याण विभागाच्या (आरटीओ) पथकाने दोन दिवस डोंबिवली पूर्व, भागात अचानक रिक्षा तपासणी मोहीम राबवून सुमारे ४० बेशिस्त रिक्षा चालकांवर कारवाई केली. या कारवाईत दीड लाखाहून अधिक रकमेचा दंड वसूल करण्यात आला, अशी माहिती साहाय्यक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद साळवी यांनी दिली. डोंबिवलीतील काही रिक्षा चालक मनमानी करुन भाडे आकारणी करतात. प्रवाशांनी विचारणा केल्यावर इच्छित स्थळी भाडे घेऊन जाण्यास नकार देतात. बहुतांशी रिक्षा चालक गणवेशात रिक्षा चालवित नाहीत. अशा तक्रारी गेल्या काही दिवसांपासून साहाय्यक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी साळवी यांच्याकडे प्रवाशांकडून करण्यात आल्या होत्या. बहुतांशी तक्रारी रिक्षा चालक मनमानीने भाडे आकारणी करत असल्याच्या आणि वाहतुकीला अडथळा होईल, अशा पध्दतीने प्रवासी वाहतूक करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. 'आरटीओ'च्या मोटार वाहन निरीक्षक अनिल धात्रक, दिनेश ढाकणे, वाहतूक शाखा उपनिरीक्षक नवनाथ चव्हाण, हवालदार विकास सोनार, गणेश कोळी, शिरोडे, ठोंबरे, कांबळे यांच्या विशेष पथकाने शनिवारी अचानक डोंबिवलीत येऊन मुख्य चौक, वर्दळीच्या रस्त्यांवर रिक्षांची तपासणी मोहीम सुरू केली. या कारवाईने रिक्षा चालकांची भंबेरी उडाली. रिक्षेत तीन प्रवासी वाहतुकीला परवानगी असताना काही रिक्षा चालक चालकाच्या बाजुला चौथा प्रवासी घेऊन प्रवास करत असल्याचे निदर्शनास आले. बहुतांशी रिक्षा चालक गणवेशात नव्हते. काही रिक्षा चालकांकडे रिक्षेची कागदपत्र आढळून आली नाहीत.

## धक्कादायक ! प्रेयसीच्या शरीराचे केले 35 तुकडे, आरोपीला अटक



प्रेयशीच्या शरीराचे केले ३५ तुकडे केल्याची घटना दिल्लीत घडली आहे . वसईच्या माणिकपूर परिसरात राहणा्या श्रद्धा वालकर या २७ वर्षीय तरुणीची दिल्ली येथे प्रियकराने निर्घृणपणे हत्या केली आहे .

वसईत डेटिंग अँपवरुन झालेली मैत्री आणि मैत्रीतून झालेलं प्रेमाच्या रूपांतरनंतर थेट दिल्लीत घडलेल्या क्रूर हत्याकांडात झाले आहे. यामुळे दिल्लीसह संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. दिल्लीत हत्या झालेली तरुणी आणि तरुण हे वसईतील राहणारे असल्याची माहिती मिळाली आहे. तरुणीच्या मित्राने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे आणि वसईच्या माणिकपूर पोलिसांच्या कार्यतत्परतेमुळे हत्याकांडाचे संपूर्ण प्रकरण उघड झालं. याप्रकरणातील आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, श्रद्धा वालकर ही वसईच्या संस्कृती सोसायटीत आपले वडिल, आई आणि भावासोबत राहत होती. श्रद्धा 2019 मध्ये मालाडच्या एका कॉलसेंटरमध्ये काम करत होती. तेव्हा वसईतच राहणाऱ्या आफताब पुनावाला या तरुणाशी एका डेटिंग अँपवरुन मैत्री झाली. कालांतराने मैत्रीचे रुपातंर प्रेमात झालं. ऑक्टोंबर 2019 रोजी श्रद्धाने आपल्या घरच्यांना आफताबच्या प्रेम संबंधाबाबत सांगितलं. मात्र या प्रेम संबंधाबाबत घरच्यांनी विरोध केला. यानंतर श्रद्धा ऑक्टोंबरमध्येच आफताब बरोबर वसईच्या नायगांव येथे एका भाड्याच्या घरात लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये राहू लागली. जानेवारी 2020 साली कोविडमुळे श्रद्धाच्या आईचा मृत्यू झाला. त्यावेळी 15 दिवसासाठी श्रद्धा घरी आली होती. त्यानंतर ती पुन्हा आफताब बरोबर राहायाला गेली. दोन वर्ष नायगांव येथे राहिल्यानंतर दोघेही मार्च 2022 मध्ये दिल्ली येथे शिफ्ट झाले. यादरम्यान श्रद्धा तिचा कॉलेजचा मित्र लक्ष्मण नाडर याच्याशी संपर्कात होती. आफताब आपल्याला खुप त्रास देत असल्याचं ती त्याला सांगत होती. मात्र अचानकपणे मे महिन्यापासून श्रद्धाचा संपर्क होत नव्हता. त्यामुळे श्रद्धाचा मित्र लक्ष्मणला याचा संशय आला. त्याने याबाबत वसई पोलीस ठाण्यात 6 ऑक्टोंबर 2022 रोजी श्रद्धाशी संपर्क होत नसल्याबाबतचा तक्रार अर्ज केला होता. वसई पोलिसांनी तो अर्ज माणिकपूर पोलिसांकडे तपासासाठी वर्ग केला. माणिकपूरचे वरिष्ठ पोलीस संपतराव पाटील आणि गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सचीन सानप यांना ही यात संशय आल्याने त्यांनी श्रद्धाच्या वडिलांना गाठून श्रद्धाची मिसिंग तक्रार माणिकपूर पोलीस ठाण्यात दाखल करुन घेतली. यानंतर तपास सुरु केला. मधल्या काळात आफताबचीही चौकशी केली असता आफताबने मे महिन्यात श्रद्धाने त्याच्याशी भांडण करुन, निघून गेल्याच सांगितलं. ती आता कुठे आहे हे माहित नसल्याचं त्याने पोलिसांना सांगितलं. आफताबच्या या सांगण्यावरुन पोलिसांचा संशय अजून वाढला. मात्र मिसिंगची घटना दिल्लीतील मेहरावली पोलीस ठाण्याच्या हद्दीत झाल्याने अधिक तपासासाठी माणिकपूर पोलिसांनी शेवटी दिल्ली गाठली. 9 नोव्हेंबर 2022 रोजी दिल्लीच्या छात्रपूरा येथील मेहरावली पोलीस ठाण्यात श्रद्धाची मिसिंग केस दाखल केली. माणिकपूर पोलीस आणि दिल्ली पोलिसांच्या एकूण तपासातून आफताबच्या या गुन्ह्याचा पर्दाफाश झाला.

## पोलीस असल्याची बतावणी करुन फसवणुक करणा-या आरोपीतास अटक करुन गुन्हयातील एकुण 60 ग्रॅम वजनाचे 2,44,000/ रु. किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत. नालासोपारा पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.



दिनांक ०१/१२/२०२१ रोजी फिर्यादी श्रीमती लक्ष्मी कमलराज राठोड, वय ६५ वर्ष यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली की, फिर्यादी या दिनांक ०१/१२/२०२१ रोजी भाजीपाला घेवून घरी येत असताना दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना पोलीस असल्याची बतावणी करून त्यांची फसवणुक करून त्यांचे गळयातील एकुण ६० ग्रम वजनाचे २,४४,०००/ रूपये किंमतीचे सोन्याचे दागिने फसवणुक करून घेवून गेले आहेत. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ५४४/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ४२०, १७०, ३४ प्रमाणे दोन अनोळखी इसमांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी सदर गुन्हयाची उकल करण्याबाबत गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा सखोल तपास करुन मिळालेल्या तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हयातील आरोपी आसीफ शबीर सय्यद इराणी यास दिनांक ०७/११/२०२२ रोजी अटक करुन त्याच्याकडून गुन्हयातील फिर्यादी यांची फसवणुक केलेले एकुण ६० ग्रम वजनाचे २,४४,०००/ रूपये किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले.सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, तत्कालीन पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, श्री. चंद्रकांत जाधव, सहा. पो. आयुक्त, नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास सुपे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नालासोपारा पोलीस ठाणे, श्री. राहुल सोनावणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), स.पो.नि. पंडीत मस्के, अमोल तळेकर, पो.हवा. किशोर धनु, पो.ना. सचिन कांबळे, अमोल तटकरे, पो.शि. कल्याण बाचकर, राजेश नाटुलकर, प्रतिक पिंगळे, पो.ना.ढोणे ( नेमणुक पोलीस उप आयुक्त कार्यालय ) यांनी केलेली आहे.

## डोंबिवलीत जयहिंद कॉलनीत तरुणाला बेदम मारहाण

सतरा वर्षापासून मैत्री असलेल्या तरुणांच्या गटात किरकोळ कारणावरुन फूट पडली. त्याचे पर्यावसन वादात होऊन मित्रांमधील एका गटाने अनेक वर्षाचा मित्र असलेल्या तरुणाला बेदम मारहाण केली. डोंबिवली पश्चिमेतील

**किरकोळ वादावरुन दोन मित्रांमध्ये फूट पडली आणि याचा परिणाम मारहाणीत झाला.**



जयहिंद का ॅलनीमध्ये जिगर किरणा दुकानासमोर रविवारी रात्री साडेआठ वाजता हा प्रकार घडला. भूषण भास्कर पाटील (३९, श्री रवीराज सोसायटी, जयहिंद का ॅलनी, विष्णुनगर, डोंबिवली) असे तक्रारदाराचे नाव आहे. भूषण आणि आरोपी तरुण अखील क्षीरसागर, विक्की सेन गुप्ता, अनुज शेट्टी, वेल्ला (सर्व राहणार जयहिंद का ॅलनी) हे अनेक वर्षापासून एकमेकांचे मित्र आहेत. गेल्या मार्चमध्ये अखील क्षीरसागर याने भूषण पाटीलची चेष्टा मस्करी केली होती. त्याचा राग भूषणला आल्याने त्याने अखीलशी असलेले मैत्रीचे संबंध तोडून टाकले होते. मैत्री तोडल्यामुळे अखील संतप्त होता. तो राग मनात धरुन अखील आणि त्याच्या इतर आरोपी मित्रांनी रविवारी रात्री भूषण पाटील याला जयहिंद का ॅलनीत जिगर किराणा स्टोअर्सजवळ गाठले. त्याच्याशी भांडण उकरुन काढून त्याला बेदम मारहाण केली.

त्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याला तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले. या घटनेनंतर मारेकरी पळून गेले. भूषणच्या तक्रारी वरुन पोलिसांनी अखील, विक्की, अनुज, वेल्ला यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

## अलिबाग: विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यावर सट्टा लावणाऱ्या तिघांना अटक



ऑस्ट्रेलियात पार पडलेल्या टी-ट्वेंन्टी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यावर सट्टा लावणाऱ्या तिघांना रायगड पोलीसांनी जेरबंद केले आहे. रायगडच्या स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पथकाने ही कारवाई केली असून अलिबाग पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अलिबाग पोलीस ठाण्याच्या हद्दी रविकिरण हॉटेल येथे काही लोक इंग्लड विरुध्द पाकीस्तान सामन्यासाठी सट्टा लावणार असल्याची खबर पोलीसांना मिळाली होती. पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे आणि अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे यांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून कारवाई करण्याचे निर्देश स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाला दिले होते.

त्यानुसार पोलीस निरीक्षक दयानंद गावडे यांच्या पथकाने रविवारी रविकिरण हॉटेलमध्ये छापा टाकला. यावेळी दोन आरोपी विश्वचषक सामन्यासाठी चालू असलेल्या अंतिम सामन्यावर त्यांच्याकडील मोबाई वर सट्टा लावून खेळत असल्याचे आढळून आले. चौकशी दरम्यान आणखिन एक आरोपी निष्पन्न झाला. जो मुंबईतून सट्टा लावण्याचे काम पहात होता. त्याला गुन्हे शाखेने मुंबईतून ताब्यात घेतले आहे. अँड्रॉ रिचर्ड फेर्नांडिस 38 रा. सांताकृज, मानिष दौलत टुकरेल 42 रा. अंधेरी आणि राजेंद्र वडलदास भाटिया रा. शास्त्रीनगर, मुंबई अशी अटक केलेल्या तिघांची नावे आहेत. तिघांकडून पाच हजार रुपयांची रक्कमही जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात जुगार कायद्यानुसार आणि भारतीय तार अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस तपास सुरु आहे. दरम्यान , आरोपींना न्यायालयात हजर केले असता तिघांनाही न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.


## विधवेशी लग्न करा आणि करोडपती व्हा

### सोशल मीडियावर फसवणुकीचा नवा फंडा



कधी लॉटरीचे आमिष दाखवून तर कधी नोकरीचे, कधी हनी ट्रॅपमध्ये अडकवून नागरिकांची आर्थिक फसवणूक केली जाते. त्यात आता सोशल मीडियावर फसवणुकीचा नवा फंडा आलाय. विधवेशी लग्न करा आणि करोडपती व्हा, या नव्या फंड्याच्या माध्यमातून काही भामटे अनेकांची फसवणूक करत आहेत. फसवणुकीचे असे अनेक गुन्हे अलीकडे समोर आले आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून नवनवीन फंडे वापरून नागरिकांना गंडा घालण्याचा प्रकार नित्यनियमाने सुरू असतो. त्यात आत सोशल मीडियावर एक विधवा तरुणी अन् तिच्यासोबत एक महिला किंवा पुरुष तरुण असलेला व्हिडीओ फेसबुकवर हमखास बघावयास मिळत आहे. या विधवा महिलेशी लग्न करा अन् कोट्यधीश व्हा, असे या व्हिडीओमधून ही महिला सांगताना दिसून येते. नेट युजर्स त्याला प्रतिसाद देत आपला मोबाइल नंबर त्या व्हिडीओ कमेंट बॉक्समध्ये शेअर करत जाळयात ओढले जात आहेत. असे प्रकार राज्यात सध्या समोर येत आहेत. पोलिस अशा प्रकारापासून सावधान राहण्यासाठी सर्वसामान्य जनतेला आवाहन करतात. याबरोबरच ही निव्वळ फसवणूक आहे असं सायबर तज्ज्ञांचं म्हणणं आहे. फेसबुकवर अशाप्रकारे अनेक व्हिडीओंमध्ये आतापर्यंत अनेकजण बळी पडलेले लोक दिसतात. या व्हायरल होणाऱ्या व्हिडीओखाली अनेक लोक त्याला प्रतिसाद देत आपला मोबाइल नंबर त्या व्हिडीओच्या कमेंट बॉक्समध्ये शेअर करत जाळयात ओढले जात आहेत. पोलिसांकडे देखील याविषयी अनेक तक्रारी येत आहेत. तसेच सायबर तज्ज्ञांकडे देखील याविषयी काय करावे याबाबत मार्गदर्शनासाठी लोक विचारत आहेत, अशी माहिती सायबर एक्सपर्ट तन्मय दीक्षित यांनी दिली. खोटी आमिषे दाखवून सोशल मीडियावर अनेक माध्यमातून लोकांची फसवणूक केली जाते. त्यामध्ये आणखी या एका या फांड्याची भर आपल्याला पाहायला मिळते.

## कल्याणमध्ये दिवसाढवळ्या घरात शिरुन मोबाईलची चोरी



ल्याण पश्चिमेत रविवारी दुपारी १२ वाजता एका भुरट्या चोराने उघड्या दरवाजावाटे शिरुन घराच्या सभागृहात मंचावर ठेवलेला मोबाईल चोरण्याचा प्रयत्न केला. घरातील तरुणीच्या हा प्रकार लक्षात येताच तिने चोरट्याला पकडण्याचा प्रयत्न केला पण तो मोबाईल घेऊन पळून गेला. शाहरूख फिरोज खान (२०, रा. मफतलाल चाळ, साईबाबा मंदिराजवळ, कळवा) असे आरोपीचे नाव आहे. तर प्रेमनाथ मोदगीकर (६३, रा. रामकुवर मेन्शन, रामवाडी, बैलबाजार, कल्याण) असे तक्रारदार रहिवाशाचे नाव आहे. प्रेमनाथ सेवानिवृत्त आहेत. रविवारी दुपारी प्रेमनाथ यांच्या पाचव्या माळयावरील घराचा दरवाजा उघडा होता. यावेळी घरातील काही मंडळी बाहेर गेली होती. घरात प्रेमनाथ यांची मुलगी सीमरन एकटीच होती. ती घरात स्वयंपाक घरात होती. तिचा मोबाईल घराच्या दर्शनी भागातील सभागृहात होता. यावेळी घरात कोणी नाही पाहून शाहरूख खाने याने गुपचूप घरात प्रवेश केला. प्रेमनाथ यांच्या घरातील सभागृहात ठेवलेला १५ हजार रुपये किमतीचा मोबाईल घेऊन तो पळू लागला. सीमरनला याची चाहूल लागताच तिने शाहरुखचा पाठलाग केला. तिने त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्याने सीमरनला जोराचा धक्का देऊन खाली पाडले. यासंधीचा गैरफायदा घेऊन तो पळून गेला.

## इन्शुरन्सच्या 65 लाखांवर डल्ला मारला, मराठी येत नसल्याचा फायदा घेत ओळखीच्या व्यक्तीने गंडवले

**नवी मुंबई :** अज्ञानाचा आणि ओळखीचा गैरफायदा घेत एका विधवा महिलेला तब्बल 65 लाखांचा गंडा घातल्याची घटना नवी मुंबई येथे उघडकीस आली आहे. याप्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी याप्रकरणी चार आरोपींना ताब्यात घेतले आहे.

किरण औंद, निखिल थोरवे, भास्कर लांडगे आणि सॅम्युअल संपत कुमार अशी ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे आहेत. यापैकी सॅम्युअल संपत कुमार याच्यावर मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल असल्याचे पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांनी सांगितले.

पीडित महिलेच्या पतीने निधन झाले आहे. महिलेला मराठी येत नाही. त्यामुळे पतीच्या निधनानंतर इन्शुरन्सचे पैसे मिळावे म्हणून तिने एका ओळखीच्या व्यक्तीला मदत करण्यास सांगितले.




मात्र या व्यक्तीने महिलेला मराठी येत नसल्याचा आणि ओळखीचा फायदा घेतला. आरोपीने आपल्या मित्राच्या नावे बोगस अकाऊंट खाते उघडले. महिलेचे इन्शुरन्सचे पैसे त्या खात्यात वळवले.

फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महिलेने वाशी पोलीस ठाणे गाठत आरोपींविरोधात तक्रार दिली. महिलेच्या तक्रारूवरुन पोलिसांनी मुख्य आरोपी आणि त्याला मदत करणा-या अन्य तीन जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी चारही आरोपींना अटक केले असून, त्यांना पोलीस कोठडीत ठेवण्यात आले आहे.याप्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत.



# बदलते हवामान आणि आरोग्य

**बदलत्या हवामानामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमी-जास्त होते. अशा स्थितीत संसर्ग वेगाने पसरतो. सर्दी, खोकला, पडसं, ताप, घसा दुखणे यासारखे आजार होऊ शकतात. म्हणून आपले शरीर या हवामानात स्थिर राहण्यासाठी सज्ज ठेवायला हवे. आपले आरोग्य आणि ऋतू याला अनुसरून आपले खानपान आणि आहारविहार असायला हवा.**

हिवाळ्यात दुपारी ऊन आणि रात्री थंडी असे वातावरण पाहावयास मिळत आहे. उष्णता आणि थंड या दोन्हीचा अनुभव देणारे वातावरण विचित्र असल्याने अनेकांना सर्दी, पडशाचा त्रास होताना दिसून येतो. हिवाळ्यात बहुतांश लोकांचा घसा दुखतो, कफ जमा होतो, खोकला येतो आणि वेदना देखील होऊ लागतात. या कारणामुळे खाण्यापिण्याचे वेळापत्रक बिघडते. म्हणून बदलत्या काळात घसा चांगला राहावा यासाठी थंड पेय, आईस्क्रीम, आंबट पदार्थ यासारख्या गोष्टींपासून दूर राहणे गरजेचे आहे. घसा खराब झाला तर ताप, डोकेदुखी, टॉन्सिल आदींचा त्रास उद्भवू शकतो. म्हणून घसा दुखणार याची आपण पुरेशी काळजी घेतली तर हिवाळ्यात चांगली तब्येत राहू शकते. अर्थात या गोष्टी आपल्या इच्छाशक्तीवर अवलंबून आहेत. यासाठी काही खबरदारी घेतली तर तब्येत सामान्य राहू शकते.

हिवाळ्यात नियमितपणे गरम पाण्याच्या गुळण्या करण्याची सवय अंगीकारावी. गरम पाण्यामुळे घशात इन्फेक्शन होत नाही आणि घशावर सूज असेल तर ती कमी होते आणि आराम पडतो. घशात वेदना होत असतील आणि आवाज निघत नसेल तर अजवाइन आणि मुलेठीच्या पानाची वाफ घेऊ शकतो. यामुळे घशातील दुखणे कमी होईल आणि आवाजही मोकळा होईल. थंडीच्या दिवसात घसा चांगला राहण्यासाठी नियमितपणे आले आणि मध याचे सेवन फायद्याचे आहे. हिवाळ्यात आले आणि मधाबरोबर दररोज हळदीचे दूध घेणे देखील आरोग्यदायी आहे. दुधाशिवाय पदार्थात टाकूनही हळद घेता येऊ शकते. कोणत्याही मार्गाने हळदीचे सेवन लाभदायी आणि फायद्याचे आहे.

बहुतांश लोक 'हर्बल टी'चे सेवन करत आहेत. यासाठी आपण दालचिनी, तुळशीची पाने, आले याचे मिश्रण करावे. त्याचे मिश्रण चाांगल्या रीतीने उकळून त्याचे सेवन करावे. आवाज बसला असेल तर शक्यतो घशाला आराम देण्याचा प्रयत्न करा. आराम पडल्यामुळे आवाज मोकळा होईल. यासाठी काही काळासाठी मौन व्रत देखील करू शकता. थंड, आंबट, मसालेदार, तिखट पदार्थांच्या सेवनामुळे घसा दुखण्याची शक्यता अधिक राहते. जोपर्यंत घसा चांगला होत नाही, तोपर्यंत अशा पदार्थांपासून चार हात लांबच राहणे सोयीचे राहील. घसा खराब झाल्यास किंवा आवाज बसला असेल तर तेलकट पदार्थांचे सेवन टाळावे. पुरी, भजी, सामोसा, कचोरी, वडापाव आदींचे सेवन करू नये. तेलकट पदार्थांमुळे घसा बसण्याची शक्यता राहते. घसा बसल्याने ताप आला असेल तर घरगुती उपायांवर विसंबून राहण्यापेक्षा डॉक्टरांकडून तपासणी सुरू करावी. वेळेत उपचार सुरू केल्यास आजारपण गंभीर होत नाही.

या दिवसात घसादुखीचा त्रास अनेकांना होतो. काही वेळा अन्न गिळण्यास अडचणी येतात आणि आवाजही घोगरा होतो. म्हणून घसा खराब झाल्यास गरम पाण्यात अर्धा चमचा मीठ आणि एक चतुर्थांश हळद याचे मिश्रण करून दिवसांतून तीन वेळेत गुळण्या करू शकता. आपल्याला खोकला असेल तर सितोपलादी चूर्णाचे मधात मिश्रण करा आणि त्याचे सेवन करा. घसादुखीपासून आराम मिळवण्यासाठी लसणाच्या दोन पाकळ्या घेऊन त्याचा कूट करा. त्या पाकळ्या गरम पाण्यात टाका आणि उकळी द्या. ते गरम पाणी कोमट होऊ द्या आणि त्याच्या गुळण्या करा. याशिवाय अगस्त्य हरीतकी रसायन याचे गरम पाण्याबरोबर दिवसातून दोन वेळा सेवन करा. यामुळे घसादुखीचा त्रास कमी होईल.

# मधुमेहावर गुणकारी मेथी

मधुमेह आणि हृदयरोग हे आपल्या लोकांमध्ये आढळून येणारे काही सामान्य रोग आहेत. रक्तातील साखरेची किंवा कोलेस्टेरॉलची उच्च पातळी यांच्यामुळे आरोग्याची इतरही गुंतागुंत होते. मेथीचे दाणे या दोन्ही समस्यांवर उपयुक्त आहेत. मधुमेह आणि हृदयरोगाच्या रुग्णांनी मेथीचे दाणे सेवन केल्यास नेहमीच्या नेमून दिलेल्या औषधांच्या उपचाराला जोड मिळते.


भारतीयांच्या स्वयंपाकामध्ये एक मसाला म्हणून नित्य नियमाने मेथीचा वापर केला जातो. मेथीचे दाणे सर्वत्र सहजपणे उपलब्ध असतात. या दाण्यांमध्ये चोथ्याचं प्रमाण अधिक असल्याने (५० टक्के), ते मधुमेहावरील उपचारात, रक्त आणि लघवीतील साखर आणि उच्च सीरम कोलेस्टेरॉल असणाऱ्या रुग्णांमध्ये कोलेस्टेरॉलची पातळी कमी करण्यात उपयुक्त ठरतात. मेथीच्या कच्च्या व शिजवलेल्या दाण्यांमधे हे सर्व गुणधर्म असतात.

मेथीची पाने (हिरवी पालेभाजी) असा कोणताही प्रभाव दाखवू शकत नाहीत. मेथीचे दाणे खाण्याचे प्रमाण हे मधुमेहाची तीव्रता आणि सीरम कोलेस्टेरॉलची पातळी यांच्यावर अवलंबून असते. त्याचा डोस २५ ग्रॅम ते ५० ग्रॅम इतका असू शकतो.

सुरुवातीला २५ ग्रॅम मेथीचे दाणे प्रत्येकी १२.५ ग्रॅमच्या दोन समान डोसमधे (अंदाजे दोन चहाचे चमचे) दोन मुख्य जेवण, दुपारचे आणि रात्रीचे, यांच्यासोबत घ्यावेत. हे दाणे रात्रभर पाण्यात भिजवून ठेवल्यानंतर तसेच खावेत किंवा ते कुटून पाण्यात किंवा ताकात मिसळून, जेवणापूर्वी १५ मिनिटे खावेत. या दाण्यांची कडू चव कमी करण्यासाठी ठराविक प्रक्रिया करावी लागते. कडवटपणा काढलेले मेथीचे दाणे बाजारात उपलब्ध नाहीत. दाण्यांचा लगदा (रात्रभर पाण्यात भिजवून ठेवल्यानंतर) पोळ्या, दही, डोसा, इडली, पोंगल, उपमा, दलिया, ढोकळा, डाळ, भाज्यांच्या आमटीत वापरता येतो. रक्तातील आणि लघवीतील साखरेची उच्च पातळी आहे, तोवर मेथीचे दाणे घ्यावेत. मेथीच्या दाण्यांच्या उपचारासोबतच चालणे यासारखा व्यायाम नियमित करण्यानेदेखील फायदा होतो. शरीराचे वजन कमी करण्यानेदेखील इन्शुलिनचे कार्य सुधारते. संपृक्त चरबी आणि साधी साखरेपासून मिळणारे आहारातील उष्मांक कमी होतात. काही रुग्णांना मेथीचे दाणे सेवन केल्यानंतर अतिसार किंवा अति प्रमाणात वायू सरण्याचा त्रास होऊ शकतो. मेथीचे दाणे हे केवळ आहाराला पूरक असा उपचार आहे आणि नेहमीचे मधुमेह-विरोधी उपचार चालूच ठेवायचे आहेत. तथापि, मेथीदाण्यांचा वापर करण्याने मधुमेह-विरोधी औषधांचा वापर कमी करता येतो. मधुमेह-विरोधी औषधांची वैयक्तिक कमाल मात्रा यासंबंधी सल्ला देता येणार नाही. आपल्या स्थितीच्या अनुसार केवळ आपले डॉक्टरच योग्य ते औषध आणि त्याचा डोस ठरवू शकतात. मधुमेहाची तीव्र गुंतागुंत झाल्यास तत्काळ वैद्यकीय सल्ला घ्यावा.

# तीन विषाणूंच्या संमिश्र संसर्गाचा आता धोका

**सध्या जगभरात कोरोनाच्या ओमिक्रॉन प्रकाराच्या 'एक्सबीबी' या सब व्हेरिएंटचा संसर्ग वाढताना दिसत आहे. हा नवा कोरोना सबव्हेरिएंट ओमिक्रॉनपेक्षा अधिक संसर्गजन्य असल्याचं शास्त्रज्ञांनी सांगितलं आहे. अशातच आता आरोग्य व्यवस्थेसमोर नवं आव्हान उभं राहिलं आहे.**




थंडीच्या मोसमाला सुरुवात झाली आहे. अशातच आता 'आरएसव्ही इन्फेक्शन' म्हणजे श्वसननलिकेचा संसर्ग वाढण्याचा धोका आरोग्यतज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे. कोरोना विषाणू, फ्लू आणि 'आरएसव्ही' संसर्ग यांचा एकत्रित संसर्ग धोकादायक ठरू शकतो, असा इशारा आरोग्यतज्ज्ञांनी दिला आहे.

अमेरिकेत कोविड १९, फ्लू आणि 'आरएसव्ही' यांच्या संमिश्र संसर्गामुळे चिंतेचं वातावरण आहे. विषाणूंचा एकत्रित संसर्ग मुख्यत्वे लहान मुलांना शिकार बनवत आहे. या तिन्ही विषाणूंचा संमिश्र संसर्ग झाल्यामुळे टेक्सासमध्ये अनेक लहान मुलांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अनेक रुग्ण भरती झाल्याने आता रुग्णालयांमध्ये बेडही शिल्लक नाहीत. यानंतर आता युरोपमध्येही या संसर्गाचा फैलाव होताना दिसत आहे.

देशात चेन्नईमध्ये 'आरएसव्ही'च्या संसर्गाची अनेक प्रकरणं समोर आली आहेत. दरम्यान, अमेरिकेच्या आरोग्यतज्ज्ञांनी 'आरएसव्ही' विषाणूच्या मुख्य लक्षणांबद्दल सांगितलं आहे. 'आरएसव्ही' आणि कोरोना विषाणूच्या संमिश्र संसर्गाची लक्षणं धोकादायक आहेत. अमेरिकेमध्ये गेल्या दोन वर्षांपासून 'आरएसव्ही' संसर्गाची प्रकरणं आढळून येत आहेत. यामध्ये कोरोना आणि ओमिक्रॉन व्हेरिएंटच्या संसर्गाने चिंतेत भर घातली आहे. त्यामुळे 'आरएसव्ही' आणि कोरोना या संमिश्र संसर्गाच्या प्रकरणांमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. अमेरिकेच्या माउंट प्लेजंटमध्ये काम करणारे बालरोगतज्ज्ञ डॉ. गेराल्ड स्टेग यांनी सांगितलं की, कोरोना आणि 'आरएसव्ही' संसर्गामुळे मुलांमध्ये श्वासोच्छ्वासाचा त्रास सर्वाधिक दिसून येत आहे. हे या दोन्ही विषाणूंच्या संमिश्र संसर्गाचं प्रमुख लक्षण असू शकतं.

'आरएसव्ही' म्हणजे 'ह्युमन रेस्पिरेटरी सिंसिटिअल व्हायरस इन्फेक्शन'. हा संसर्ग दोन वर्षांपर्यंतच्या मुलांसह वृद्धांमध्येही आढळतो. यामध्ये रुग्णाच्या श्वासनलिकेला सूज येते आणि श्वास घेण्यास त्रास होतो. अधिक गंभीर प्रकरणात न्यूमोनिया आणि ब्रॉन्कायलाइटिस होऊ शकतो. 'आरएसव्ही' संसर्गाची सौम्य आणि फ्लू सारखी लक्षणं दिसू शकतात.

'आरएसव्ही' हा विषाणू संसर्गजन्य आहे. हिवाळ्यात फ्लूचं प्रमाण वाढणं सामान्य आहे; पण आधी कोरोना आणि त्यातच 'आरएसव्ही' संसर्ग झाल्याच्या वाढत्या प्रकरणांमुळे आरोग्यतज्ज्ञही चिंतेत आहेत. ताप, सर्दी, खोकला, भूक न लागणं, शिंका, धाप लागणं, मळमळ होणं, थंडी लागणं ही या तीन विषाणूंच्या संमिश्र संसर्गाची काही सामान्य लक्षणं आहेत.

# पक्षाघाताचा धोका

तुम्ही पक्षाघाताबद्दल ऐकले असेलच. मुख्यतः वृद्धत्व आणि शरीरातील रोगांमुळे पक्षाघाताचा धोका संभवतो. मात्र, आजकाल तरुणांमध्येही ही समस्या वाढत आहे. अर्धांगवायूची स्थितीमध्ये या आजारात शरीराचा एक भाग काम करणे बंद करतो. याला अर्धांगवायूदेखील म्हणतात, ज्यामध्ये हात, पाय, तोंड आणि डोळे यांच्या एका बाजूला परिणाम होतो. अर्धांगवायूबद्दल अगोदर काहीही माहिती नसते, काही मिनिटांत त्याचा परिणाम शरीरावर होऊ शकतो. अशावेळी मनात प्रश्न येतो की, पक्षाघाताचा धोका कोणाला आहे आणि त्याची लक्षणे काय आहेत.

**अर्धांगवायू म्हणजे काय? :** अर्धांगवायूला ब्रेन स्ट्रोक असेही म्हणतात. या अवस्थेत मेंदूच्या कोणत्याही भागाला अचानक इजा झाल्यामुळे किंवा रक्तपुरवठा बंद झाल्यामुळे एका बाजूचे अवयव काम करणे बंद करतात. याला अर्धांगवायू म्हणतात. कधी-कधी सौम्य स्ट्रोकमुळे शरीराच्या एका बाजूला खूप अशक्तपणा येतो.


**अर्धांगवायू का होतो? :** अर्धांगवायू होण्यामागे साधारणपणे दोन कारणे असतात, त्यातील एक म्हणजे ब्रेन हॅमरेज, म्हणजेच मेंदूकडे जाणारी रक्ताची नळी फुटणे. दुसरे कारण म्हणजे मेंदूला रक्तपुरवठा करणाऱ्या पाईपमध्ये काही प्रकारचा अडथळा निर्माण होणे. बहुतेक प्रकरणांमध्ये, पाईप ब्लॉक झाल्यामुळे ही समस्या उद्भवते. अहवालानुसार ८५ टक्के पॅरालिसिसची प्रकरणे ब्लड पाईप ब्लॉक झाल्यामुळे होतात.

**पक्षाघाताचा धोका कोणाला जास्त? :** जर आपण जोखीम घटकाबद्दल बोललो, तर रक्तदाब रुग्ण, मधुमेह रुग्ण, लिपिड प्रोफाइल वाढल्यामुळे पक्षाघाताचा धोका जास्त असतो. ज्या लोकांना हृदयाशी संबंधित समस्या आहेत आणि रक्त गोठण्याची समस्या आहे, त्यांना पक्षाघात होण्याची दाट शक्यता असते.

**पक्षाघाताची काही चिन्हे :** अर्धांगवायू होण्यापूर्वी शरीरात कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. डॉक्टरांचे म्हणणे आहे की फारच कमी प्रकरणांमध्ये हे आधीच आढळून येते. हे फार लवकर घडते, जोपर्यंत रुग्णाला काही समजत नाही किंवा परिस्थिती हाताळण्याची संधीही मिळत नाही.

**सावधानता बाळगावी :** अर्धांगवायू झाला हे अगोदर कळत नाही, पण ज्यांना आधी लहानसा अर्धांगवायू होतो. त्यांनी याबाबत सजग राहावे. कधी-कधी खूप कमी वेळ बोलण्यात अडचण येते किंवा शरीराच्या एका भागात अशक्तपणा येतो, तर ही सौम्य अर्धांगवायूची लक्षणे असू शकतात. तथापि, या परिस्थितीत, रुग्ण काही काळानंतर बरा होतो. डॉक्टर त्याला **TI-** म्हणतात. हे अर्धांगवायूचे लक्षण मानले जाऊ शकते.

**अर्धांगवायूची लक्षणे :** अर्धांगवायू झाल्यावर हात, पाय आणि तोंडावर परिणाम होतो. अशा परिस्थितीत एकीकडे चालणे, बोलणे, लिहिणे आणि व्यवस्थित काम करण्यात त्रास होतो. अशा रुग्णांमध्ये अशक्तपणा खूप येतो.



# जपा फुफ्फुसांचे आरोग्य

**वाढत्या प्रदूषणामुळे राजधानी दिल्लीत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शेजारील राज्यात जाळण्यात येणाऱ्या कचऱ्यामुळे राजधानीला प्रदूषणाचा विळखा पडला आहे. परिणामी नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून सरकारने शाळा बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. थंडीच्या दिवसात प्रदूषणाची तीव्रता अधिक राहत असल्याने श्वसनविकार तसेच दम्याचा त्रास असलेल्या मंडळींना प्रसंगी आपत्कालीन औषधांचा आधार घ्यावा लागतो. वास्तविक आपण दिवसभरात २५ हजार वेळेस श्वास घेतो आणि सोडतो. सध्या आपण प्रदूषणाच्या वातावरणात राहात असल्याने त्याचे विपरीत परिणाम आरोग्यावर होत आहेत. विशेषतः हिवाळ्यात हवेतील प्रदूषण वाढणे हे फुफ्फुसाचा विकार असलेल्या लोकांना त्रासदायक ठरते.**

फुफ्फुस हे शरीरातील सर्वात सक्रिय आणि महत्त्वाचे व संवेदनशील अवयवांपैकी एक आहे. परंतु हृदयाप्रमाणे त्याला सेलिब्रिटीचा दर्जा मिळालेला नाही. हृदयामुळे होणारे बहुतांश मृत्यू हे फुफ्फुसाशी निगडित आजारपणामुळे होतात. भारतात मृत्यूच्या दहा प्रमुख कारणांपैकी चार कारणे ही फुफ्फुस आणि श्वसनविकाराशी संबंधित आहेत. क्रॉनिक ऑब्सट्रिक्टिव्ह पल्मोनरी डिसिज (सीओपीडी), लोवर रेस्पेटरी इन्फेक्शन, कर्करोग (फुफ्फुसाचा कर्करोग दुसऱ्या स्थानावर) आणि ट्यूबरक्लोसीस असे विकार होऊ शकतात. हवेतील वाढते प्रदूषण हे या समस्येत आणखीच भर घालते.

दोन दशकांपूर्वीपर्यंत फुफ्फुसाचा कर्करोग आणि सीओपीडी होण्यास धूम्रपान कारणीभूत मानले जात होते. कारण ९० टक्के प्रकरणे ही सिगारेट ओढणाऱ्यांत आढळून यायची. आता ही समस्या सर्वांनाच होत आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चच्या एका अहवालानुसार २०१९ मध्ये हवेतील प्रदूषणाच्या कारणामुळे भारतात १६.७ लाख लोकांचा मृत्यू झाला आहे. हा आकडा २०२० च्या देशातील कोरोनामुळे मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांच्या तुलनेत १२ पट अधिक आहे. याशिवाय फुफ्फुसाशी निगडित आजारपण होण्यास हवेतील प्रदूषण हे ४० टक्क्यांपर्यंत जबाबदार आहे. 'नेचर जेनेटिक्स'मध्ये प्रकाशित अभ्यासानुसार हवेतील प्रदूषणामुळे सर्व प्रकारचे नॉन कम्युनिकेबल डिसीज जसे की कार्डिओ वॉस्क्युलर, ऑटो इम्यून डिसिज, डायबिटीज, अर्थरायटिस आदी आजारपण होण्याची शक्यता अधिक बळावते.

प्रदूषित हवेत श्वास घेतल्याने फुफ्फुसाची क्षमता आणि कार्यप्रणालीवर परिणाम होतो किंवा वेळेच्या अगोदरच म्हातारपण येऊ लागते. याशिवाय टॉक्सिन्स आणि प्रदूषित घटकांच्या संपर्कात राहिल्याने फुफ्फुसाची हानी होऊ शकते. जागतिक आरोग्य संघटनेच्या इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सर (आयएआरसी) च्या मते, फुफ्फुसाचा कर्करोग होणाऱ्या प्रमुख कारणांपैकी हवेतील प्रदूषण हे एक महत्त्वाचे कारण आहे. हवेतील प्रदूषणाचा सर्वाधिक परिणाम हा प्रौढांच्या तुलनेत मुलांवर अधिक होतो. मुलांची श्वसनक्रिया प्रौढांच्या तुलनेत वेगाने होते. मुलांची वाढती उंची आणि सवयीमुळे ते प्रदूषित वातावरणाच्या अधिक संपर्कात राहतात. ज्या मंडळींना धूळ, माती याची ॲलर्जी असेल आणि या कारणांमुळे अचानक झटका येत असेल तर त्यांनी आपत्कालीन औषधी घरात ठेवायला हवी. हिवाळ्यात फुफ्फुसाचे विकार वाढण्यामागे तीन कारणे आहेत. पहिले म्हणजे तापमानात घसरण होते तेव्हा श्वसननलिका आकुंचित होतात आणि श्वास घेण्यास त्रास होतो. दुसरे म्हणजे थंडी आणि कोरड्या हवेमुळे आजारी फुफ्फुसंच नाही तर चांगल्या फुफ्फुसांना देखील त्याचा त्रास होतो. तिसरे म्हणजेधुरळा, यामुळे प्रदूषणाची पातळी अधिकच वाढते. प्रदूषित हवेत श्वसननलिका आणि फुफ्फुसाचा थेट संबंध येत असल्याने ऊतकांच्या पेशींच्या डीएनएची हानी होते.

चेहरा आणि नाक झाकून ठेवा. व्यायाम करू नका. तोंडाऐवजी नाकाने श्वास घेण्याचा प्रयत्न करा. जेणेकरून फुफ्फुस हे थेटपणे थंड हवेच्या संपर्कात येणार नाही. दमा आणि श्वसनविकार असणाऱ्या रुग्णांनी एन-९५ मास्क घालूनच घराबाहेर पडावे.



संपादकीय...

## अनायासेन मरणम्...

वैद्यकीय क्षेत्रात निर्माण होणारे काही प्रश्न निव्वळ रोगमुक्ती किंवा रुग्णाचा जीव वाचवणे यांपुरते मर्यादित नसतात. ते आपल्या जीवन-मृत्यू या विषयीच्या आकलनाविषयीच मूलभूत शंका उत्पन्न करतात. सध्या गेल्या दोन शतकांच्या मानाने माणसाचे एकंदर आयुर्मान वाढलेले आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे हे शक्य आहे. आपण सर्वसाधारणपणे असे समजतो की जीवन चांगले, श्रेयस्कर असते आणि मरण वाईट व टाळण्याजोगे असते. म्हणूनच येऊ घातलेला मृत्यू टाळणे हे डॉक्टरांचे परम कर्तव्य असते असे डॉक्टर स्वतः आणि रुग्णही मानतात. पण या समजुतीबद्दल थोडा विचार करायला हवा. जीवन खरोखरच नेहमीच चांगले, वांछनीय असते का? शक्य असेल तर, शक्य असेल तेव्हा मरण टाळणेच इष्ट असते का? वैद्यकीय नीतिमीमांसेच्या चौकटीत विचार करायचा झाला तर आजारी पडून जे मरणाच्या दारात उभे असतात किंवा आजारपणामुळे ज्यांना जगणे असह्य होते, त्यांच्यासाठी जगण्या-मरण्याचा हाच अर्थ असतो का? असावा का? डॉक्टरांना रुग्णाला दयामरण किंवा इच्छामरण देण्याचा अधिकार असावा का? काही पाश्चात्य देशात काही पूर्व अटींचे पालन केले तर असा अधिकार दिला जातो. भारतातील कायदा असा अधिकार मानत नाही, पण या प्रश्नावर कित्येक वर्षे विचारमंथन चालू आहे.

इच्छामरण किंवा दयामरण हे शब्द आपण ‘Euthanasia’ या मूळ ग्रीक शब्दाचा प्रतिशब्द म्हणून वापरतो. याचा मूळ अर्थ आहे ‘चांगले मरण’ किंवा सहज येणारे मरण. आज त्याचा अर्थ प्रामुख्याने असहनीय वेदनांमधून सुटका देणारे मरण असा होतो. आपले हाल न होता शांतपणे मरण यावे अशी बहुतेकांची इच्छा असते. पण ‘इच्छामरण’ या संकल्पनेत नुसते ‘मरणे’ नाही तर ‘मारणे’ समाविष्ट असते, म्हणून त्याचा नैतिक अंगाने सखोल विचार करावा लागतो. इच्छामरण आत्महत्या किंवा खून यांपेक्षा वेगळे आहे. असाध्य आजार, प्राणांतिक वेदना यांमुळे रुग्ण स्वेच्छेने मरण पत्करायला तयार असतो. तसेच रुग्णाचा आजार असाध्य आहे हे एकापेक्षा अधिक डॉक्टरांना मान्य असावे लागते.

इच्छामरणाच्या बाजूने आणि विरुद्ध अनेक युक्तिवाद केले जातात. इच्छामरणाचे ‘सक्रिय’ आणि ‘निष्क्रिय’ असे दोन प्रकार करता येतात. असाध्य आजाराने ग्रस्त रुग्णाला प्राणघातक इंजेक्शन देऊन त्याला जीवन संपवायला प्रत्यक्ष मदत करणे हा पहिला प्रकार, तर अशा रुग्णावर केले जाणारे उपचार थांबवून त्याचे मरण जवळ आणणे हा दुसरा प्रकार. अनेकदा असे समजले जाते की जन्म आणि मरण या गोष्टी ईश्वराधीन आहेत, त्यात माणसाने ढवळाढवळ करू नये. पण जात्या जीवाला वाचवायची डॉक्टरांची धडपड हीसुद्धा ढवळाढवळच म्हणायला हवी. नास्तिकांना हा युक्तिवाद मान्य असण्याचे कारणच नाही. नैतिकदृष्ट्या या प्रश्नाकडे बघताना रुग्णाचे हक्क आणि त्याच्या कुटुंबियांचे हक्क यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो.

जगण्याचा हक्क प्रत्येकाला असतो, तसा मरणाचाही असावा का? जगणे गुणवत्तापूर्ण राहणार नसेल, त्यात आनंद नसेल आणि त्याचा कुणाला उपयोग नसेल, तर मरणाची इच्छा करणे खरंच गैर आहे का? त्याचप्रमाणे रुग्णाला मरणाचा हक्क देणे किंवा नाकारणे या दोन्हींचे कुणावर आणि काय परिणाम होऊ शकतात हे लक्षात घ्यावे लागते. रुग्णांचे वय, शारीरिक स्थिती, सांपत्तिक स्थिती, बरे होण्याची शक्यता असे घटक विचारात घ्यावे लागतात. बरे झाल्यानंतर रुग्णांचे आयुष्य पूर्ववत होणार आहे की उर्वरित काळ अंथरूणाला खिळून, परावलंबी राहावे लागणार आहे याचा विचार करावा लागतो.

एखाद्या वयस्क व्यक्तीच्या खर्चिक उपचारांसाठी तरुण पिढीच्या मूलभूत गरजांना मोठ्या प्रमाणात कात्री लावणे प्रत्येक वेळी योग्य असते का? अर्थात कुणाही व्यक्तीला तिच्या इच्छेविरूद्ध मरायला भाग पाडणे हे निश्चितच अनैतिक आहे. स्वेच्छेच्या नावाखाली अशा हत्या होण्याची शक्यता हा इच्छामरणाला कायदेशीर परवानगी मिळण्यातला मोठा अडथळा आहे.

● ● ●

## ‘युक्रेनी हिवाळ्या’चे जागतिक पडसाद...



रशियाने युक्रेनवर केलेल्या आक्रमणाला आता अडीचशेपेक्षा जास्त दिवस झालेले असले तरी ते त्याच्या अंतिम टप्प्यात आले असे म्हणता येणार नाही. काही अभ्यासकांच्या मते हे युद्ध जर हिवाळ्यात संपले नाही तर ते बराच काळ लांबण्याची शक्यता आहे. त्याचे कारण म्हणजे महाबलाढ्य रशियाच्या अश्वमेधाची सांगता एका महिन्यात युक्रेनची राजधानी कीव्हवर ताबा मिळून होईल असा बऱ्याच अभ्यासकांचा समज होता, परंतु वास्तवात आज फक्त १५ ते २० टक्के युक्रेनी भूभागावर रशियाचा कब्जा झालेला आहे. मे-जून पर्यंत असे वाटत होते की रशियाचे पुतीन हे युक्रेनमधील अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की सरकार उलथवून एखादे रशियाधार्जिणे काळजीवाहू सरकार स्थापून देतील व पुढे जाऊन हे नवखे सरकार डोनबास हा प्रांत रशियाला आंदण म्हणून देईल, त्याच बरोबर युक्रेन नाटो सदस्य होण्याच्या महत्त्वाकांक्षेला तिलांजलीच देईल.

परंतु आजतागायत, रशियाचा आक्रमणगाडा युक्रेनने रोखला आहे. युक्रेनने आतापर्यंत महत्प्रयत्नांनी खारकीव्ह, ईजियम, चेर्निहाइव, सुमी या शहरांना रशियन मगरमिठीतून साक्षात खेचून काढले आहे. नुकतेच युक्रेनी सैन्याने प्रयत्नांची पराकाष्ठा करून खेरसनला मुक्त करवून घेतले. असे अग्निदिव्य करून युक्रेनी सैन्याने झेलेन्की सरकारला वाचवले आहे आणि जनतेचा विश्वास संपादन केला आहे. जरी युक्रेनला पाश्चिमात्य राष्ट्रे मानवीय मदत व शस्त्रास्त्रांची खैरात देत असले तरी युक्रेनी नागरिकांची व सैनिकांची जाज्वल्ल्य देशभक्ती नक्कीच वाखाणण्यासारखी आहे. तसे पहिले तर युक्रेन हे राष्ट्र सर्वदृष्टीने भीमकाय रशियाच्या तुलनेत छोटेखानी असल्यामुळे केवळ समोरासमोरची झुंज परवडणारी नाही, त्यामुळेच युक्रेनला गनिमी कावा अपरिहार्य आहे. व याचाच एक भाग म्हणून आठ ऑक्टोबरला क्रायमियाला रशियाशी जोडणाऱ्या ‘कर्च पुलाला’ युक्रेनने अपरिमित हानी पोहोचवली होती. हा पूल काळा समुद्र व अझोवचा समुद्र यांच्या मधून जात असल्यामुळे तो व्यापारी व सामरिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा होता. अशा प्रकारच्या हल्ल्यामुळे रशियाचे एक प्रकारचे नाक कापले गेल्यानंतर, रशियाने प्रत्युत्तर म्हणून कीव्ह व परिसरात क्षेपणास्त्रे व आत्मघातकी ड्रोन डागून अग्नितांडव आरंभले. याचे उत्तर म्हणून ऑक्टोबरच्या शेवटी-शेवटी परत युक्रेनी सेनेने सेवास्तोपोलला छावणी टाकून असलेल्या रशियन आरमारावरच हल्ला केला होता. रशियाने संयुक्त राष्ट्राच्या मध्यस्थीने युक्रेनला अन्नधान्याच्या रूपाने देण्यात येणारी मदतच रोखल्यामुळे हा देश जगात टीकेचा धनी झाला होता.

कर्च पूल तोडल्याची प्रतिक्रिया म्हणून युक्रेनवर केलेल्या या भीषण हल्ल्याचे अर्थातच पुतीन यांनी समर्थन केले होते. याउलट अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन, संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस अंतोनियो गुटेरस व ‘जी-सेव्हन’ राष्ट्रांनी या हल्ल्याची तीव्र शब्दात निंदा केली होती. युरोपीय संघाने एक पाऊल पुढे जाऊन रशियाला ‘युद्ध-गुन्ह्यां’ना सामोरे जाण्यासाठी तयार राहण्याची धमकी दिली आहे. युक्रेनियन राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्या मते रशिया एक आतंकवादी राष्ट्र (टेररिस्ट स्टेट) आहे. संयुक्त राष्ट्राचे युक्रेनचे दूत सर्गेई किसलीतस्या म्हणतात की रशियाने सार्वभौम युक्रेनवर आक्रमण करून संयुक्त राष्ट्राच्या सनदेची (चार्टर) उघड विटंबना केली आहे. रशियाचे ऐतिहासिक मित्र असलेले चीन व भारत यांनी मात्र यावर फारसे भाष्य करण्याचे तटस्थपणे टाळले आहे. या दोन्ही उदयोन्मुख महासत्तांना अमेरिकेला शह देण्यासाठी रशियाची साथ हवी आहे. त्याचबरोबर जागतिक आर्थिक निर्बंधांनी त्रस्त झालेला व राजकीय दृष्ट्या काहीच एकाकी पडलेल्या रशियाकडून चीन व भारत अखंडपणे स्वस्त तेल व नैसर्गिक वायू घेत आहेत. याव्यतिरिक्त आपला देश लष्करी तंत्रज्ञानावर लष्करी तंत्रज्ञानावर व युद्धसामुग्री वर बव्हंशी रशियाच्या मदतीवर अवलंबून आहे. चीनच्या दृष्टीने पाहायचे तर येणाऱ्या काळात जेव्हा चीन तैवानवर हल्ला करेल तेव्हा त्यालाही रशिया पाठीशी असणे आवश्यक आहे.

रशियाने क्रायमिया व डोनबास या युक्रेनी प्रदेशांचा कब्जा करून त्याला अझोव समुद्रापासून तोडल्यानंतर झपोरीझिया व खेरसनवर हक्क सांगितला. पुढे तो ओडेसा व मायकोलेव्ह या युक्रेनी सागरी शहरांवरहि कूच करू शकतो. असे भविष्यात झाले तर युक्रेनचा काळया समुद्राशी संबंध तुटून जाऊन युक्रेन एक ‘भूवेष्टित देश’ होऊन जाईल, म्हणजे त्याचे अख्खे आरमार रशियाच्या घशात जाईल. असे हे सागरी अपंगत्व युक्रेनला या घडीला नक्कीच परवडणारे नाही. असे झाले तर युक्रेनच्या पश्चिमेला भिडलेल्या मोल्दोवा या छोट्या बाल्कन राष्ट्राची झोप मात्र नक्की उडू शकते. त्याच्या रशियन-भाषिक बहुल ट्रान्सनिस्ट्रिया या प्रांतावर रशियाने आधीच हक्क सांगितला आहे. इकडे युक्रेनवरची ‘मोहीम फत्ते’ झाल्यावर रशिया मोल्दोवावर हल्ला करण्याचा मोह रोखू शकणार नाही. बाल्कन प्रदेशातल्या स्लाव्ह वंशीयांवरचे रशियाचे बंधुप्रेम जगजाहीर आहे. सर्व स्लाव्ह भाषीय/वंशीय देशांना रशियाच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष नियंत्रणात आणून रशियाचा ‘अखंड महारशिया’ बनवण्याची रशियाची अघोरी महत्त्वाकांक्षा फार जुनी आहे. बाल्कन भागात युद्ध भडकणे ही विश्व शांतीच्या दृष्टिकोनातून नक्कीच धोक्याची घंटा आहे. प्रथम विश्व युद्धाची नांदी बाल्कनमध्ये झाली होती हे आपण जाणतोच.

रशियन राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन जगाला वारंवार हे दाखवण्याचा अट्टहास करतात की युक्रेनकडून बळकावलेल्या प्रदेशातील जनता ही प्रामुख्याने रशियन भाषिक व रशियावादी आहे. असे करून ते जणू डोनबास प्रांत हा रशियाचाच भाग आहे असे जणू रंगवण्याचा प्रयत्न करत असतात. परंतु या सगळया खटाटोपात ते युक्रेनला युरोपचा ‘सीरिया’ करणार कि काय तो येणारा काळच ठरवेल. रशियाने ही विस्तारवादी नीती हा न्याय भासवण्यासाठी चार प्रांतात (लुहान्स्क, डोनेस्क, झपोरीझिया व खेरसन) सप्टेंबर महिन्यात तथाकथित सार्वमत घेतले होते. त्यात बहुमताने स्थानिक लोक रशियात सामील होण्याची मनीषा बाळगतात हे जाहीर केले त्यानंतर जनमताचा सन्मान करूनच या भागांना रशियात जमा केले हे पुतीन वारंवार सांगण्यास विसरत नाहीत. परंतु युक्रेनवर चढाई केल्यानंतर लगेच फेब्रुवारीमध्ये पुतीन यांनी निक्षून सांगितले होते की लुहान्स्क, डोनेस्क हे आता सार्वभौम राष्ट्रे आहेत व त्यांची सार्वभौमता अबाधित राहिली पाहिजे (२० एप्रिल २०२२ ला लोकसत्तेत प्रकाशित झालेल्या ‘रशियन जुगार कधी थांबणार’ या माझ्या लेखात मी रशिया हे भाग गिळंकृत करेल अशी भीती जाहीर केली होती). आता पुतीन स्वतःच्या ‘त्या’ निर्णयावरून घूमजाव करत आहेत. ते आता सांगतात की हे प्रांत आता रशियाचे अविभाज्य भाग झाले आहेत.

एकीकडे युक्रेनियन राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की हे नाटो राष्ट्रांना आयुधांची कुमक अपुरी आहे व आता प्रत्यक्ष सैन्यच पाठवा असे आर्त विनंती करताना दिसतात. परंतु आता रशियाविरुद्ध नाटो सैनिक लढविणे म्हणजे महायुद्धाची नांदी होय हे वेगळे सांगण्याची गरज नाही. दुसरीकडे अद्ययावत अवकाशी सुरक्षा कवच (आयर्न डोम) युक्रेनला देऊ करण्यासाठी इस्रायलने असमर्थता दाखवली आहे तर अमेरिका ‘नासा’ चे अतिप्रगत एअर डिफेन्स सिस्टिम देण्याचा नुसता विचारच करत आहे. सद्य परिस्थितीत युक्रेनची हवाई बचाव यंत्रणा यथातथाच असल्यामुळे रशिया वापरत असलेल्या इराणी बनावटीचे कामकाझी (आत्मघाती क्षेपणास्त्र वजा ड्रोन) शाहिद-१३६, फतेह-११० यांसारखी क्षेपणास्त्र अग्नितांडव घडवत आहेत. रशियाला इराण बेलारूस सारखी उघड मदत जरी करत नसला तरी पडद्याआड त्याच्याशी हातमिळवणी करतो आहे.

● ● ●

## औरंगाबाद शहर पोलिसांची मोठी कारवाई, एक लाखांचा गुटखा पकडला

औरंगाबाद शहर पोलिसांच्या पुंडिकनगर पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल एक लाखांचा गुटखा पकडला आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच त्यांच्या ताब्यातून प्रतिबंधीत गुटखा जप्त करण्यात आला आहे. शिवाजी आनंदराव देशमुख (वय 38 वर्षे रा. गणेशनगर औरंगाबाद) आणि इरफान खान अफसर खान (वय 23 वर्षे रा. मोती कारजा औरंगाबाद) असे या आरोपींचे नावं आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुंडलिकनगर पोलीस ठाणे हद्दीतील गणेश नगर येथे राहणारा शिवाजी देशमुख हा पानटपरी तसेच दुकानादारांना प्रतिबंधीत गुटखा, सुगंधीत तंबाखु, पान मसाला विक्री करत असल्याची माहिती गुप्त बातमीदारामार्फत पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक एस.के. खटाणे यांनी सोबतच्या स्टॉफसह देशमुखचा शोध घेत त्याच्या घरावर छापा मारला. यावेळी पोलिसांना त्याच्या घरात मोठ्याप्रमाणावर गुटखा मिळुन आला. त्यामुळे पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन गुटखा कुठून आणला याबाबत चौकशी केली.



पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या शिवाजी देशमुखची चौकशी केली असता, त्याने सदरचा माल नबाबपुरा येथील अजता टोबैको या दुकानातून खरेदी केला असल्याची माहिती दिली. त्यावरून पोलिसांच्या पथकाने तत्काळ अजता टोबैकोवर छापा मारला असता, दुकानातून इरफान खान याने गुटख्याचा मोठा साठा दुकानात लपवून ठेवल्याचे समोर आले. त्यामुळे पोलिसांनी इरफानला ताब्यात घेत दुकानातील गुटखा देखील जप्त केला. दोन्ही आरोपींकडून एकूण 1 लाख 3 हजार 626 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर याबाबत अन्न व औषध प्रशासन विभागाला माहिती देऊन त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुंडलिकनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप गांगुर्डे, सहाय्यक पोलीस निरीक्षक शेषराव खटाणे, सहाय्यक फौजदार रमेश सांगळे, पोलीस नाईक बाळाराम चौरे, गणेश डोईफोडे, संतोष पारधे, जालिंदर मान्टे, कल्याण निकम, राजेश यदमळ, इम्रान अत्तार, अजय कांबळे, दिपक जाधव यांनी केली.

गुटखा विक्री कधी थांबणार...

औरंगाबाद शहरासह जिल्ह्यात सर्वत्र बंदी असलेल्या गुटख्याची खुलेआमपणे विक्री होत असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे औरंगाबाद जिल्ह्यात इतर राज्यातून गुटखा दाखल होत असतांना देखील पोलिसांना याबाबत महिती मिळत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. गावातील टपरीपासून तर शहरातील प्रत्येक किराणा दुकानात गुटखा सहजपणे उपलब्ध होतो. तर गुटखा कारवाईची जबाबदारी असलेल्या अन्न व औषध प्रशासन विभागाकडून सोयीस्कर दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप केला जात आहे.


### मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

क्रीडा विभाग

जा.क्र.मनपा/क्री.वि./ ३१ /२०२२-२३ दि. ११/११/२०२२

।। जाहिर सुचना ।।

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील विविध शाळा, विद्यालय, महाविद्यालयातील होतकरु खेळाडूंच्या सुप्त गुणांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत “जिल्हास्तरीय शालेय क्रिडा स्पर्धा-२०२२-२३” चे आयोजन करण्यात येणार आहे. सदर स्पर्धेचे आयोजन करणेसाठी खालीलप्रमाणे साहित्य आवश्यक आहे.

| अ.क्र. | तपशिल | परिमाण | दर सर्व करांसहित |
|---|---|---|---|
| १. | खो-खो पोल | ४ जोडी | |
| २. | वॉलीबॉल पोल व नेट | २ जोडी | |
| ३. | फुटबॉल पोल व नेट | १ नग | |
| ४. | गोळा फेकसाठी गोळा | ४ कि.ग्रॅ.- ०६ नग | |
| | | ५ कि.ग्रॅ.- ०४ नग | |
| | | ६ कि.ग्रॅ.- ०४ नग | |
| ५ | थाळी फेकसाठी थाळी | १ कि.ग्रॅ.- ०६ नग | |
| | | १.५ कि.ग्रॅ.- ०४ नग | |
| | | १.७५ कि.ग्रॅ.- ०४ नग | |
| ६ | भाला फेकसाठी भाला | ६०० ग्रॅम – ०४ नग | |
| | | ७०० ग्रॅम - ०२ नग | |
| | | ८०० ग्रॅम – ०२ नग | |

तरी इच्छुक पुरवठादारानी दि.१४/११/२०२२ ते दि. २२/११/२०२२ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत क्रीडा विभाग, महानगरपालिका मुख्य कार्यालय, पहिला माळा, भाईंदर(प.) या विभागात दरपत्रक देण्यात यावे. कोणतेही कारण न देता दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे हा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

सही/-

(रवि पवार)

उप-आयुक्त (क्रीडा विभाग)

मिरा-भाईंदर महानगरपालिका

जा.क्र मनपा/जनसंपर्क/ ३५४/ २०२२-२३

दिनांक ११/११/२०२२

## जिवलग मित्रानेच मित्राला संपवले, संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद



**डोंबिवली** : सांस्कृतिक नगरी म्हणून ओळखल्या जाणा-या डोंबिवली शहरात गेल्या काही वर्षात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. किरकोळ कारणावरून शहरात खुलेआमपणे हत्या आणि मारहाणीच्या घटना वारंवार घडत आहेत. डोंबिवलीमध्ये पुन्हा एकदा किरकोळ कारणावरून मित्रानेच आपल्या मित्राची हत्या केल्याचं समोर आलंय. फक्त एक सिगारेट या हत्येला कारणीभूत ठरली आहे. याप्रकरणी रामनगर पोलीसांनी आरोपीला अटक केली आहे.

जयेश देवजी जाधव असे हत्या करण्यात आलेल्या 38 वर्षीय तरुणाचे नाव आहे. तो डोंबिवलीमधील पेंडसे नगर परिसरारातील तुषार को. हौ. सोसायटी परिसरातील रहिवासी आहे. हरिश्चंद्र उर्फ बकुळ रामदास चौधरी असे हत्या करणा-या 32 वर्षीय आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याला चोळेगाव ठाकुर्ली येथून अटक केली.

मयत आणि आरोपी हे दोघेही मित्र आहेत. जयेश आणि बकुळ या दोघांनीही दारूचं सेवन केलं होतं. त्यानंतर आरोपीने जयेशला सिगारेट आणायला सांगितली. यावरून दोघांचा वाद झाला.

रागाच्या भरात बकुळने आधी हातापायाने जयेशला मारायला सुरुवात केली. त्यानंतर त्याचे डोके भिंतीवर आणि जमिनीवर आपटले. या मारहाणीत जयेशचा मृत्यू झाला. आरोपी सध्या अटकेत असून, त्याला कल्याण कोर्टात हजर केलं जाणार आहे.

## मुंबईत किलर हॅटमॅनची दहशत, नेमके काय आहे प्रकरण?; पोलीस म्हणाले...

**मुंबई** : मुंबईत सध्या किलर हॅटमॅनची दहशत पसरली आहे. या किलरने रात्री निर्जन रस्त्यावर एका महिलेची चाकूने हल्ला करत हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. हत्येची ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. अंधेरी परिसरात ही घटना घडल्याची चर्चा आहे. हत्येचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून, यामुळे प्रचंड खळबळ माजली आहे. मात्र या व्हिडिओबाबत मुंबई पोलिसांनी खुलासा केला आहे. मुंबईत अशी कोणत्याही महिलेची हत्या झाली नसून, व्हायरल व्हिडिओवर विश्वास ठेवू नका, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.



अशा प्रकारचा कोणीही हॅटमन नाही आणि महिलेची हत्या केली नाही. अशी कोणतीही घटना समोर आलेली नाही. अंधेरी परिसरात अशी घटना घडल्याचा दावा खोटा असल्याचे सांगत, हत्येची घटना मुंबई पोलिसांनी स्पष्टपणे फेटाळून लावली आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये एका निर्जन रस्त्यावर एक कार येऊन थांबते. या कारमधून एक महिला खाली उतरते. महिला उतरल्यानंतर कार निघून जाते. यानंतर महिला रस्ता ओलांडणार इतक्यात काळ्या कपड्यात टोपी घातलेला एक व्यक्ती मागून आला आणि त्याने महिलेची मान आवळली.

## दुहेरी हत्याकांडाने पुणे हादरलं! चक्क नगरसेवकाच्या घरासमोरच हत्येचा थरार

**पुणे** : पुण्यात दिवसेंदिवस हत्येच्या वाढत्या घटनांनी चिंता वाढली आहे. आता तर दुहेरी हत्याकांड घडल्यामुळे एकच खळबळ माजलीय. धारदार शस्त्रांनी वार करत दोघांची निर्घृण हत्या करण्यात आली.





धक्कादायक बाब म्हणजे एका नगरसेवकाच्या घरासमोरच हत्येचा थरार घडला. या हत्याकांड प्रकरणी येरवडा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास केला जातोय.

पुण्यातील पांडू लमाण वस्ती इथं मध्यरात्री 3 वाजता दुहेरी हत्याकांडाची ही घटना घडली. अनिल उर्फ पोपट वाल्हेकर आणि सुभाष उर्फ किसन राठोड अशी हत्या करण्यात आलेल्यांची नावं आहेत. चक्क तलवार आणि पालघन सारख्या धारदार हत्याकांना दोघांवर वार करत त्यांचा खून करण्यात आला.

पूर्ववैमनस्यातून हे हत्याकांड घडल्याचा संशय व्यक्त केला जातो आहे. येरवडा पोलिस या हत्येप्रकरणी अधिक तपास करत आहे. या दोन्ही हत्यांमागे मूळ कारणं नेमकं काय आहे, याचा छडा लावण्याचं आणि मारेक-यांना अटक करण्याचं आव्हान सध्या पोलिसांकडून केलं जातं आहे. येरवडा पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेतली या हत्याप्रकरणाचा कसून तपास केला जातोय. अनिल आणि सुभाष यांच्यावर धारदार शस्त्राने नेमका कुणी वार केला? या हत्येमागचा हेतू काय होता? मध्यरात्री घडलेल्या या हत्याकांडाचा कट कुणी रचला होता? या सगळ्या प्रश्नांची आता पोलिसांच्या तपासाअंती समोर येतील. अद्याप या दुहेरी हत्याकांडप्रकरणी कुणालाही अटक करण्यात आलेली नाही.

## 167 सीसीटीव्ही, 97 सीमकार्ड आणि बहुरुपी तपास! अलिबाबा टोळी आणि पोलिसांचं सीक्रेट मिशन

**मुंबई** : तब्बल 167 सीसीटीव्ही, 97 सीमकार्ड आणि 11 महिन्यांच्या बहुरुपी तपासानंतर अखेर अलिबाबा टोळीतील दोघा चोरट्यांना अटक करण्यात आलीय. मुंबई पोलिसांनी तपासात घेतलेल्या मेहनतीचं अखेर चीज झालंय. सोने चोरीप्रकरणी गेल्या काही महिन्यांपासून पोलीस अलिबाबा टोळीच्या मागावर होते. अखेर टोळीतील दोघे चोर पकडण्यात पोलिसांना यश आलं आहे.

या चोरांना पकडण्यासाठी पोलिसांना कधी पोस्टमन तर कधी चक्क हातगाडीवाल्याचंही रुप धारण करावं लागलं होतं. आता चोरीचा माल, एक सोनार आणि दोघे चोर अशा एकून तिघांना बेड्या ठोकण्यात आल्या असून त्यांची आता कसून चौकशी केली जातेय.

मुंबईच्य दहिसर पोलिसांनी 2021 मध्ये सोन्याच्या



आरोपाखाली अलिबाबा टोळीतील चोरांना अटक केली. डिसेंबर 2021 साली चोरीची घटना घडली होती. यासाठी पोलिसांनी 167 सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली होती. 97 सीमकार्डचे लोकेशन तपासून अखेर दहिसर पोलीस आरोपीपर्यंत पोहोचले.

पकडलेल्या चोरांची विशेष बाब म्हणजे या लोकांनी वापरलेली सीमकाड्‌र्स ट्रकमध्ये अलिबाबाच्या नावावे येत होती, असं पोलिसांच्या तपासातून समोर आलंय. त्यामुळे या चोरांना पकडण्याच्या मोहिमेला दहसित पोलिसांच्या पतखाने अलिबाबा असं नाव दिलं होतं. आता अटक करण्यात आलेल्या चोरट्यांकडून पोलिसांनी 18.7 लाख रुपये किंमतीचा सोन्याचा तुकडा जप्त केलाय. या चोरीप्रकरणी मुंबई पोलीस झोन 12च्या डीसीपी स्मिता पाटील यांना सांगितलं की..

31 डिसेंबर 2021 रोजी दहिसर पूर्व चुनाभट्टी येथील सचिन नगर येथील एका फ्लॅटमधून 933 ग्रॅम सोन्याचे दागिने आणि 40 हजार रुपयांची रोकड चोरीला गेली होती. चोरट्यांना पकडण्यासाठी पोलिसांनी 167 सीसीटीव्ही आणि 97 सिमकार्डची मदत घेतली.

## मृत पित्याला जिवंत करण्यासाठी 2 महिन्याच्या बालकाचे अपहरण, पोलिसांच्या सतर्कतेमुळे अघोरी कृत्याचा पदार्फाश

**दिल्ली** : भारतीय समाजात अजूनही अंधश्रद्धेची पाळेमुळे घट्ट रोवली गेली आहेत. ही अंधश्रद्धा अनेक निष्पाप बालकांच्या जीवावर बेतत आहे. अंधश्रद्धेपोटी लहान मुलांचा हकनाक बळी दिला जात आहे. काही लोक धनप्राप्तीसाठी तर काहीजण आपल्या इतर इच्छा पूर्ण करण्यासाठी निष्पाप जीवाला बळी देतात. अशीच एक क्रूर घटना सध्या उघडकीस आली आहे. एका तरुणीने हे धक्कादायक कृत्य केले आहे.

आरोपी तरुणीच्या वडिलांचा ऑक्टोबरमध्ये मृत्यू झाला. अंत्यसंस्कारावेळी कुणीतरी तिला मृत पित्याला पुनर्जीवन देण्यासाठी समान लिंगाच्या बाळाचा बळी देण्याचे सुचवले. त्यामुळे त्या तरुणीने लहान बालकांचा शोध सुरू केला होता.

मृत पित्याला जिवंत करण्यासाठी सफदरजंग रुग्णालयातून दोन महिन्यांच्या बालकाचे अपहरण केले. अपहरण केलेल्या या मुलाचा बळी देऊन



ती आपल्या वडिलांना पुनर्जीवन देण्याचा प्रयत्न करणार होती.

बाळाच्या अपहरणाची पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली होती. निष्पाप बालकाचा अंधश्रद्धेतून बळी घेण्याचा प्रयत्न करणा-या युवतीला दिल्ली पोलिसांनी अवघ्या 24 तासांच्या आत अटक केल्याचे दक्षिण पूर्व दिल्लीच्या डीसीपी ईशा पांडे यांनी सांगितले.

अमर कॉलनी पोलीस ठाण्यातील पोलिसांना दिल्लीच्या गढी गावातून जवळपास दोन महिन्यांच्या बाळाचे 10 नोव्हेंबर रोजी संध्याकाळी 4 वाजता अपहरण करण्यात आल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी पुढील तपासाची चक्रे फिरवली.

पोलिसांचे एक विशेष पथक देखील तयार करण्यात आले. अपहरणकर्त्या तरुणीने तक्रारदार महिलेच्या बाळाचे रुग्णालयातून अपहरण केले होते. आरोपी तरुणीने आपण रुग्णालयातील बाळांची सांभाळ करणा-या स्वयंसेवी संस्थेची सदस्य असल्याचे सांगितले होते. त्यामुळे महिलेने तिच्यावर विश्वास ठेवून आपल्या बाळाचा ताबा तिच्याकडे दिला होता.

## गोखले पूल बंद; अंधेरी ते गोरेगावदरम्यान प्रचंड वाहतूक कोंडी, हजारो वाहनांच्या रांगा



**मुंबई** : अंधेरी पूर्व व पश्चिमेला जोडणारा गोखले पूल वाहतुकीसाठी बंद केल्याने मुंबई पश्चिम द्रुतगती मार्गावर वाहतुकीची प्रचंड कोंडी झाली आहे. अंधेरी ते जोगेश्वरी दरम्यानच्या मार्गावर एअरपोर्टपासून विलेपार्ले ते गोरेगावपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. या वाहतूक कोंडीत हजारो वाहने अडकली असून यामध्ये रुग्णवाहिकाही सामील आहेत. नोकरपेशा लोकांबरोबरच शालेय विद्यार्थ्यांनाही या वाहतूक कोंडीचा फटका बसला आहे.

अंधेरी पूर्व व पश्चिमेला जोडणारा गोखले पूल हा गेल्या सोमवारपासून बंद केल्याने येथील एस.व्ही. रोड, जे.पी. रोड, लिंक रोड, अंधेरी सब वे, कॅप्टन विनायक गोरे पूल, इर्ला जंक्शन, पार्ले स्टेशन या विविध भागात मोठी वाहतूक कोंडी होत आहे. रोजचे २० ते २५ मिनिटांचे अंतर कापायला आता किमान एक ते दीड तास लागत असल्याने सांताक्रूझ ते जोगेश्वरी भागात राहणारे नागरिक तर त्रस्त झाले आहेत.

गोखले पूल बंद झाल्याने मोठी वाहतूक कोंडी होत असून नागरिकांचे अतोनात हाल होत आहेत. कॅप्टन गोरे पूल, विलेपार्ले पू /प, सांताक्रुज पश्चिम, अंधेरी पश्चिम व पूर्व, मृणाल गोरे पूल येथील वाहतूक कोंडीने या पूलाला जोडणारे रस्ते जाम होतात. अंधेरी गोखले ब्रिज वाहतुकीसाठी बंद केल्याने, ठाकरे गटाने अंधेरीत आंदोलन केले असून जर आठवडाभरात वाहतूक कोंडीवर तोडगा काढला नाही, तर तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## फसवणुकीचा आणखी एक नवा फंडा, ते भामटे भक्त दुकांदारांनाचा गंडवतात

**नाशिक** : डिजिटल व्यवहार करत असतांना काही भामटे यामध्ये फसवणूक करत असल्याचा एक नवीन प्रकार नाशिकमध्ये समोर आला आहे. नाशिकच्या दुकानदारांना ऑनलाईन व्यवहार करणा-यांपैकी बनावट व्यवहार केल्याचे समोर आले आहे. खरंतर या फसवणुकीच्या घटणेने पोलीसही चक्रावून गेले असून गुन्हेगाराचा शोध घ्यायचा तरी कसा ? असा प्रश्न नाशिकच्या सायबर पोलीसांसमोर निर्माण झाला आहे. डिजिटल इंडियाचा नारा देत असतांना डिजिटल व्यवहार करावे यासाठी सरकारकडून प्रोत्साहित केले जात आहे. पण त्यातही फसवणूक होत असल्याने चिंता वाढत चालली आहे. अशातच नाशिकमधील काही दुकानदारांना बनावट व्यवहार दाखवत फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे.





डिजिटल इंडियाच्या माध्यमातून ऑनलाइन व्यवहार करण्यावर भर दिला जात असतांना फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ होऊ लागली आहे. त्यानुसार छोटे-मोठे सर्वच व्यावसायिक ऑनलाईन व्यवहाराला प्राध्यान्य देत असून पाच ते दहा रुपयांपासून हे व्यवहार केल्याचे दिसून येत आहे.

यासाठी नागरिकांकडून फोन पे, गुगल पे, पेटीएम, अमेझान पेसारखे ऑनलाइन पेमेंट अपचा वापर केला जात असून प्रत्येकाच्या मोबाइलमध्ये हे अप दिसून येत आहे. पेटीएम स्पूफ, प्रंक पेमेंट व फेक पे यांसारख्या काही अपच्या माध्यमातून बनावट व्यवहार तयार करून दुकानदारांची, व्यापा-यांची फसवणूक केली जात असल्याचे काही प्रकार समोर आले आहेत.

दुकानातून वस्तूंची खरेदी केल्यानंतर या अपच्या माध्यमातून ट्रान्झक्शन आयडी तयार करून पेमेंट झाल्याची पावती दुकानदारांना दाखवून त्यांची फसवणूक केली जात आहे.

## बँकेतील पैशांचा कर्मचा-यांनी जुगार खेळला ?

**गुन्हा दाखल चौघांना अटक... कुठं घडलं हे?**

**नाशिक** : नाशिक जिल्ह्यातील ओझर येथील सिद्धिविनायक बँकेच्या घोटाळ्याप्रकरणी अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तब्बल 3 कोटी 33 लाख रुपयांचा अपहार झाल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ओझर पोलीसांनी याप्रकरणी रोखपालासह पाच जणांवर गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये चार जणांना अटक करण्यात आली असून एक जण फरार आहे. चार वर्षांपासून लेखापाल दिनेश शौचे यांनी वेळोवेळी पतसंस्थेत 3 कोटी 33 लाख रुपयांची आपल्या अधिकाराचा गैरवापर दुसरीकडे वळविले होते. शौचे यांना याबाबत कुठलाही अधिकारी काहीही एक विचारणा करत नव्हता. त्यामुळे शौचे यांच्यावर कुणाचा वरदहस्त आहे अशीही चर्चा सुरू झाली. काही दिवसांपूर्वी बँकेच्या एका संचालकाने केलेल्या आरोपांमध्ये तथ्य आहे कि नाही यावर चौकशी करून गुन्हा दाखल करू अशी भूमिका बँकेने घेतली होती. त्यामध्ये बँकेच्या कर्मचा-यांनी रोलेट या जुगारासाठी वापरल्याची ओरड देखील समोर आली होती.

नाशिकच्या ओझर येथे असलेल्या सिद्धिविनायक बँकेच्या बाबत मोठा घोटाळा समोर आला आहे, त्याबाबत ओझर पोलीस ठाण्यात पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून चौघे अटकेत असून एक जण फरार आहे.

बँकेचे लेखापाल दिनेश शौचे यांनी वेळोवेळी पतसंस्थेत 3 कोटी 33 लाख रुपयांची रक्कम आपल्या अधिकाराचा गैरवापर दुसरीकडे वळविली होती. ही बाब बँकेच्या वतुर्ळात आणि पोलिसांत गेल्याने त्यांनी या रकमेची जमावामव करण्यास सुरुवात केली होती.





सिद्धिविनायक बँकेचा घोटाळा खरंतर जुलै महिन्यामध्येच उघड झाला होता. त्यामुळे ओझरच्या सहकार क्षेत्रात खळबळ उडाली होती. बँकेतील हा घोटाळा ऐकून ठेवीदार यांच्यामध्ये मोठी घबराट निर्माण झाली असून अनेकांनी ठेवी काढून घेण्यासाठी चौकशी सुरू केल आहे. यावेळी बँकेकडून बँकेची स्थिती चांगली असून घाबरु नये असं आवाहन केलं आहे.

या प्रकरणात बँकेचे सीए तुषार पगार यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल झाला असून तीन कोटीहून अधिक रकमेचा अपहार झाल्याचे तक्रारीत नमूद केले आहे.

## कुत्र्याला गुंगीचे औषध दिले... मुलीच्या डोक्याला बंदूक लावली.. दरोडेखोरांनी 20 लाखांची जबरी लूट कशी केली ?

**नाशिक** : नाशिकच्या ग्रामीण भागातील गुन्हेगारीचे सत्र काही केल्या थांबायला तयार नाही. त्यातच ग्रामीण भागातील दरोडे पडण्याच्या घटना सातत्याने घडत असल्याने ग्रामीण पोलीसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले. सिन्नर येथील दरोडेखोरांना अटक करून काही तास उलटले नाही तोच दिंडोरी येथील एका शेतक-यांच्या बंगल्यावर दरोडा पडल्याची घटना समोर आली आहे. नाशिकच्या ग्रामीण भागातील नागरिक या गुन्हेगारीने भीतीच्या सावटाखाली गेले असून पोलीस काय करत आहे ? असा सवाल उपस्थित करत असतांना नाशिक शहरापासून दिंडोरी तालुक्याच्या हद्दीत असलेल्या वणी रस्त्यावर ढकांबे येथे मोठा दरोडा पडला आहे. रतन बोडके यांच्या घरावर हा दरोडा पडला आहे. मध्यरात्रीच्या दरम्यान बोडके कुटुंब गाढ



झोपेत असतांना शस्त्रधारी सात ते आठ दरोडेखोरांनी जबरी लूट केली आहे. यावेळी घरात प्रवेश करत असतांना पाळीव कुत्र्याला दरोडेखोरांनी गुंगीचे औषध दिले होते.

घरात प्रवेश केल्यानंतर झोपेतून उठून बसलेल्या मुलीच्या डोक्याला दरोडेखोरांनी बंदूक लावत सोने, पैसे बाहेर काढून द्या अशी धमकी दिली होती .यावेळी बोडके कुटुंबाने दागिने, रोख रक्कम असा अंदाजे 20 लाखांचा मुद्देमाल देऊन टाकला होता, हा सर्व मुद्देमाल घेऊन दरोडेखोरांनी धूम ठोकली होती.

या दरोडयाच्या घटणेने बोडके कुटुंबासह संपूर्ण जिल्हातच घबराट पसरली आहे. पोलीसांनी दरोडेखोरांना तात्काळ अटक करावी अशी मागणी होऊ लागली आहे. या दरोडयाची माहिती मिळताच ग्रामीण पोलीसांनी घटनास्थळी धाव घेतली, एकीकडे नाशिक ग्रामीण पोलिसांना नुकतेच नवे पोलीस अधिक्षक मिळाले असून त्यांच्या समोर गुन्हेगारीचे नवे संकट उभे राहिले आहे.

पोलीस बातमी पत्र
ALL SCAN & PAY
ACCEPTED HERE
PhonePe
G Pay
Pay

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898